# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई -४०० ००५.
दूरध्वनी क्र.०२२ २२१६ ३९६४/२२१६ ३९६५/२२१६ ३९६९ फॅक्स क्र. ०२२-२२१६ ३९७६
वेब-साईट : www.mercindia.org.in ई-मेल : mercindia@mercindia.org.in

## जाहीर सूचना

**प्रकरण क्र.२०१० चा २०** **दिनांक :२३.०६.२०१०**

**नूतनशील ऊर्जेच्या दराबाबत आयोगाने स्वत: तयार केलेल्या प्रारूप आदेशावर सुनावणी**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दराच्या निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० मधील विनियम ८ नुसार, महाराष्ट्रात आर्थिक वर्ष २०१०-११ करीता नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानासाठी सामान्य वीज दर निश्चित करण्यासाठी आयोगाने स्वत: पुढाकार घेऊन प्रारूप आदेश तयार केला आहे. सदर आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.

२. या प्रारूप आदेशाच्या संदर्भात आयोग जनतेकडून अभिप्राय / सूचना मागवित आहे. आपले अभिप्राय / सूचना आयोगाचे सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग १३वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई -४०० ००५ (फॅक्स क्र. ०२२-२२१६ ३९७६, ई-मेल : mercindia@mercindia.org.in) यांना दि.०८ जुलै, २०१० पूर्वी मिळतील अशा बेताने पाठवावेत.

३. इच्छुक व्यक्तींनी त्यांच्या हरकती आणि अभिप्राय / सूचना इंग्रजी व मराठीत सहा प्रतींमध्ये, त्यांचे संपूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेलचा पत्ता नमूद करून पाठवावेत. तसेच हरकती जर कोणत्याही ग्राहक वर्गवारीच्या संस्थेच्या वतीने पाठविण्यात येत असल्यास त्याचा उल्लेख करण्यात यावा. इच्छुक व्यक्तीस जर त्याचे म्हणणे प्रत्यक्ष मांडावयाचे असेल तर त्याचाही उल्लेख करण्यात यावा व यासाठी **शनिवार, दि.१०.०७.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता सुंदरबाई सभागृह, ५ वा मजला, श्री नाथीबाई ठाकरसी मार्ग, आयकर भवनच्या मागे, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०** येथे होणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी संधी देण्यात येईल व त्यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

(के.एन.खवारे)
सचिव, मविनिआ

मुंबई,
दिनांक २३.०६.२०१०